महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर - ४४० ०२२
दुरध्वनी क्र. ०७१२-२९५९३८१ CIN - U85300PN2019NPL187405 ई-मेल - mahajyotingp@gmail.com

जा.क्र.महाज्योती/नागपूर/आस्था/2392/2024-25 दि.19/09/2024

# परिपत्रक

**विषय :- महाज्योतीमार्फत राबविण्यात येणाऱ्या सन** - 2024-25 **करीता** MPSC, UPSC, MPSC Group B & C, MPSC **अभियांत्रिकी सेवा**, SSC-CGL, IBPS Banking/LIC/Railway/ AAO **परीक्षापुर्व प्रशिक्षणांतर्गत घेण्यात आलेल्या चाळणी परीक्षेचे निकालाबाबत निवेदन**.

महाज्योती आणि शासनामार्फत कार्यरत असणाऱ्या अन्य संस्था मधील विद्यार्थ्यांना परीक्षा पूर्व प्रशिक्षण देण्याकरीता प्रशिक्षण संस्थांची निवड करण्याचे काम स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण अमंलबजावणी समितीद्वारा करण्यात येते. तथापि या समितीच्या कामकाजाबाबत विविध तक्रारी उद्भवलेल्या आहेत. महाज्योतीच्या संचालक मंडळाने या तक्रारींची दखल घेतलेली आहे. विद्यार्थ्यांना गुणवत्ता पूर्ण प्रशिक्षण मिळावे व प्रशिक्षण संस्था निवडीच्या प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची तक्रार असू नये तसेच भविष्यामध्ये कोणतेही न्यायालयीन प्रकरण उद्भवू नये या सर्व बाबींचा विचार करून महाज्योती संस्थेच्या संचालक मंडळाने समितीद्वारा केल्या जाणाऱ्या संस्था निवडीच्या प्रक्रियेमधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतलेला आहे.

**महाज्योतीच्या संचालक मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार याबाबतची सर्व वस्तुस्थिती शासनाला कळविण्यात आलेली आहे. शासनाकडून याबाबत अंतिम निर्देश प्राप्त झाल्यानंतर प्रशिक्षण कार्यक्रम राबविला जाणार आहे. याकरीता निश्चित काही कालावधी लागणार आहे. संस्थांच्या निवडीबाबतचा अंतिम निर्णय झाल्यानंतर सर्व परीक्षांचे निकाल जाहिर करण्याची कार्यवाही करण्यात येईल. कृपया सर्व विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी.**

**(स्वा.)**
(राजेश खवले)
**व्यवस्थापकीय संचालक**
महात्मा ज्योतीबा फुले संशोधन
व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर